**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५१/२०२०** **दिनांक २६/०६/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/०६/२०२० ते २६/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून ०१/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२०/०६** | **२१/०६** | **२२/०६** | **२३/०६** | **२४/०६** | **२५/०६** | **२६/०६** | | **२७/०६** | **२८/०६** | **२९/०६** | **३०/०६** | **०१/०७** |
| ०.० | २.० | ३०.० | १६.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ३० | १० | २६ | १३ | १२ |
| ३३.६ | ३४.२ | ३४.८ | ३४.२ | ३३.८ | ३४.२ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३५ | ३४ | ३४ | ३४ |
| - | २४.६ | २५.० | २४.० | २३.४ | २३.६ | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २४ | २४ | २४ | २४ |
| ४ | ४ | ६ | ४ | ४ | ४ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| - | ७८ | ८६ | ८४ | ७८ | ८१ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८७ | ८५ | ८७ | ८४ | ८६ |
| ७० | ७६ | ७१ | ७७ | ७४ | ७२ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६३ | ६४ | ६८ | ६४ | ६२ |
| ३.७ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | १.९ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ७ | ७ | ७ | ७ | ७ |
| आ. | शांत | शांत | Calm | Calm | नै. | - | **वाऱ्याची दिशा** | नै.प. | नै.द. | द. | नै.द. | नै.द. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २७ जून ते १ जुलै, २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • पुढील पाच ही दिवस हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने भात रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीला सलग २ ते ३ रात्री बांधावरील खेकडे बत्तीच्या उजेडात पकडून त्यांची संख्या कमी करावी आणि नंतर विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही). |
| **नागली** | **रोपवाटीका** | • पुढील पाच ही दिवस हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नागली रोपवाटीकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **चिकू** | **फळधारणा** | • चिकू फळांची पावसाळ्यात बुरशीजन्य रोगामुळे होणाऱ्या फळगळीच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची दुसरी फवारणी पाऊसाची तीव्रता कमी असताना करावी. |
| **फणस** | **वाढीची अवस्था** | • फणसाच्या पाच वर्षावरील प्रत्येक झाडाला २० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, १ कि.ग्रॅ. युरिया, १.५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट व ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाच ही दिवस हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने वेलवर्गीय भाजीपाला पिकांना पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वाढीच्या अवस्थेत असलेल्या वेलवर्गीय भाजीपाला पिकांना काठीचा आधार दयावा किंवा मंडपाची व्यवस्था करावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**